# टेंडर नोटीस

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरूनगर ता.खेड जि.पुणे याठिकाणी चालविण्यात येणारे उपहारगृह संस्थेस भाडेकरारावर देण्याचे आहे. त्यासाठी त्याच्या शर्ती व अटी खालीलप्रमाणे.

१. उपहारगृह चालविणेकरिता अन्न व पुरवठा भेसळ विभाग, महाराष्ट्र शासन यांचा परवाना असणे आवश्यक.
२. उपहारगृहाची वेळ सकाळी ७ ते सायं. ७ पर्यंत राहिल.
३. उपहारगृहामधील फर्निचर व इतर सुविधा संस्थेने अद्ययावत करून ठेवलेल्या आहेत. त्यात काही बदल करावयाचा असल्यास टेंडर धारकाने स्वत: खर्चाने करावयाचा आहे.
४. उपहारगृह व भोवतालचा परिसर स्वच्छतेची संपुर्ण जबाबदारी टेंडर धारकाची असेल.
५. मालाचा दर्जा व आरोग्यवर्धक पदार्थांचा दर्जा व किंमत ही संस्थेने नियुक्त केलेली उपहारगृह समिती विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे ठरविल.
६. सदर उपहारगृह ११ महिन्यांचे कालावधीकरिता भाडयाने देणे आहे.
७. अनामत रक्कम म्हणुन किती रक्कम संस्थेकडे बिनव्याजी जमा करण्यास तयार आहात.
८. सदर उपहारगृहामध्ये पानपटटीवरील व्यसनी पदार्थ विकण्यास मनाई असेल तसेच इतर व्यवसायही त्याठिकाणी करता येणार नाहीत.
९. सदर उपहारगृह चालविण्यास देण्याचे भाडे दरमहा कमीत कमी रक्कम किती असेल ते नमुद करून अर्ज करावा.
१०. उपहारगृहामध्ये टी.व्ही. व रेडिओ वापरण्यात येणार नाही.
११. उपहारगृहाचा वापर फक्त महाविद्यालयाशी निगडित असणा—या व्यक्तिंसाठीच असेल. त्यामध्ये विद्यार्थी/विद्यार्थीनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठीच असेल.
१२. उपहारगृहाचे लाईट बिल हे टेंडर धारकाने स्वत: भरावयाचे आहे.
१३. उपहारगृहाचे ठिकाणी बेकायदेशीर गोष्टीस चालवत असणारी व्यक्ती जबाबदार राहिल.
१४. खाद्य पदार्थ निकृष्ट दर्जाचे निघाल्यास अगर कोणाला त्रास झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी तुमच्यावर राहिल. संस्था अथवा महाविद्यालय त्यास जबाबदार राहणार नाही.

वरीलप्रमाणे सर्व अटी व शर्तींच्या अधिन राहुन दि. २२.१०.२०१९ अखेर संस्था कार्यालयामध्ये सिलबंद पाकिटामध्ये निविदा प्रत्यक्ष जमा कराव्यात.

| प्राचार्य | मानद सचिव | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| हु.रा.महाविद्यालय | खे.ता.शि.प्र.मंडळ | खे.ता.शि.प्र.मंडळ | खे.ता.शि.प्र.मंडळ |